RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

## UGC-CARE LISTED



# RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# Index


| अ.क्र. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या धर्मविषयक विचारांची प्रस्तुतता | श्री. संतोष बुधाजी भावार्थे | १.५ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्त्व | डॉ. किरण जयदेव सावे | ६.११ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्भगवद्गीता | डॉ. सचिन खोकले | १२.१४ |
| ४ | अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. विनोद संभाजी सोनवणे | १५.२१ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २२.२८ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | २९.३४ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ३५.३९ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रासंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ४०.४४ |
| ९ | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ४५.४८ |
| १० | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्या 'सत्याग्रह' तत्वज्ञानाचे महत्व | प्रा. प्रेरणा राऊत | ४९.५२ |
| ११ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडें | ५३.५६ |
| १२ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ५७.५९ |
| १३ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ६०.६३ |
| १४ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ६४.६६ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# गांधीजींचे स्त्री विषय विचार

**प्राधापक रामदास येडे**
(इतिहास विभाग प्रमुख)
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

**घोषवारा(Abstract):**

समाजव्यवस्था जर योग्य रीतीने चालू ठेवायची असेल तर स्त्री व पुरुष या दोघांचाही विकास होणे आवश्यक आहे. कारण स्त्री व पुरुष हे दोघेही समाजव्यवस्थेचे दोन महत्वाचे अंग आहेत. पण भारतातच नव्हे तर जगातील सर्व प्रगत अप्रगत देशातही स्त्रियांना समाजव्यवस्थेने गौण स्थान दिले आहे. शेतीचा शोध लागण्याआधी माणूस हा अन्न म्हणून एक तर शिकारीवर अवलंबून होता नाही तर फळे गोळा करून खात आहे. या काळात पुरुष शिकारीला जात असे व घरातील स्त्री ही फळे व कंदमुळे गोळा करत असे. त्या काळी स्त्री व पुरुषयांच्यात भेद नव्हता. स्त्री घरी राहून कंदमुळे गोळा करत असे कारण तिला मुलांचे संगोपण करावे लागत असे. पुढे शेतीचा शोध लागला व मनुष्य जीवन स्थिरावले. या काळात पुरुष शेतीची अवजड कामे करू लागला स्त्री देखील त्याची मदत करत असे पण मातृत्व, बालसंगोपन व घरात राहून अन्न शिजवणे (कारण या काळात अग्नीचा शोध लागला होता) या मुळे स्त्री घरीच राहत असे व त्यामुळे ती पुरुषावर अवलंबून राहू लागली. स्त्री जरी घरी राहून घरच्या विविध जबाबदाऱ्या पार पडत असली तरी 'तू पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे असे तिच्या मनावर बिंबवले गेले.

स्त्री व पुरुष यांच्यात निसर्गत:च जैविक क्षमता सारख्या नसतात. त्यामुळे इ.स.पूर्व काळापासूनच स्त्रियांमध्ये न्यूनगंड निर्माण करण्यात आला. स्त्री ही अनेक मानवी अधिकारापासून वंचित राहिली. 'चूल आणि मुल' या पलीकडे स्त्रियांना जाऊ दिले नाही. स्त्रियांना या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केल्याचे दिसून येते. १९ व्या शतकापासून जगातील अनेक देशात स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले गेले. भारतातही महात्मा फुले यांची १९ व्या शतकात स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात महत्वाची भूमिका आहे. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्त्री सबलीकरणाचे विचार हे स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वाचे ठरतात.

१९२० नंतर भारतीय राष्ट्रीय चळवळीतील गांधीयुग सुरु होते. महात्मा गांधीजींचा भारताच्या राजकीय पटलावर उदय झाल्यानंतर खऱ्या अर्थाने भारताच्या राजकारणात स्त्रियांचा सहभाग सुरु झाला.

१९२० ते १९४५ या काळात गांधीजींनी असहकार चळवळ (१९२०), सविनयकायदेभंग चळवळ (१९३०) आणि छोडो भारत चळवळ (१९४२) ही देशव्यापी आंदोलने केली त्यात स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. गांधीजींच्या नेतृत्वामुळे स्त्रिया स्वातंत्र्य लढ्यात उतरल्या. गांधीजींच्या प्रत्येक सभेत स्त्रियांची उपस्थिती असायची. गांधीजींच्या मते 'माझ्या सत्य व अहिंसेवर आधारलेल्या या लढ्यात भाग घेण्यास स्त्रिया समर्थ आहेत, त्यांची शक्ती जागृत झाली पाहिजे तेव्हाच स्त्रियांमध्ये सामर्थ येईल. आपल्या भारत देशात जी परकीय सत्ता आपल्या इच्छेविरुद्ध जुलमाने राज्य करते आहे ती नाहीशी करायची असेल तर स्त्रियांमधील सामर्थ्य जागृत केले पाहिजे.

गांधीजींनी आपल्या लेखनातून स्त्रियांच्या अनेक समस्यांवर भाष्य केले आहे. त्या काळात अस्तित्वात असलेल्या अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यावर टीका केली. त्यांनी पडदा पद्धती, बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी या विरोधात आवाज उठवला. या सर्व प्रथा म्हणजे हिंदू समाजाचा शाप आहे असे ते मनात ज्या स्त्रियांना समाज अबला समजत होता, त्या अबला नसून त्या पुरुषांपेक्षा कितीतरी सामर्थ्यवान आहेत हे समाजाला दाखवून देण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न केले.

गांधीजींच्या मते पुरुषाने आपल्या पत्नीस बाहुली किंवा भोगाची वस्तू म्हणून नव्हे तर आपल्या जीवनातील सहचारिणी म्हणून वागवले पाहिजे. शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या पत्नीला तिच्या पतीने शिक्षण दिले पाहिजे. आपल्या समाजामध्ये पूर्वीपासूनच कायदे हे पुरुष करत आले आहेत आणि हे कायदे नेहमी न्याय असतीलच असे नाही. प्रचलित समजत स्त्रियांना असणारे कनिष्ठ स्थान गांधीजींना मान्य नव्हते. गांधीजींच्या मते स्त्रियांना पुरेपूर स्वातंत्र्य दिले जावे. स्त्री म्हणजे पुरुषांची नैतिक शक्ती होय. स्त्रीची बौद्धिक शक्तीदेखील पुरुषांएवढीच असते.

गांधीजींनी विधवा विवाहाचे समर्थन केले आहे. पण गांधीजींच्या मते त्या विधवा स्त्रियांनीच विवाह करावा ज्यांना मुले नाहीत. स्त्रीच्या सासरच्या लोकांनी अशा स्त्रियांचा विवाह लावून द्यायला हवा. ज्याविधवा स्त्रियांना मुले आहेत त्यांनी आपल्या मुलांच्या संगोपनात लक्ष घालावे व आपल्या मुलांच्या पालनपोषणाची सर्व कर्तव्ये पार पाडावी.

गांधीजींनी हुंडा या प्रथेस विरोध केला आहे. त्यांच्या मते हुंडा हा भारतीय समाजास लागलेला सर्वात मोठा कलंक आहे. हुंडा ही अध:पतनकारी प्रथा असून त्याचा आग्रह धरणारा पुरुष स्वत:च्या शिक्षणास बट्टा लावत असतो. हुंडा ही प्रथा स्त्री जातीचाच नाही तर समाजव्यवस्थेचा देखील अपमान करते.

गांधीजींनी बालविवाह या प्रथेस विरोध केला आहे. गांधीजींच्या मते बालविवाह ही प्रथा जेवढी शारीरिक दृष्ट्या वाईट तेवढीच नैतिकदृष्ट्या देखील वाईट आहे. गांधीजी म्हणतात 'बालविवाहाची वाईट रूढी जितकी शहरात तितकीच खेड्यात सुद्धा पसरलेली आह. ही रूढी फक्त स्त्रीच बंद करू शकते.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

जर स्त्रीने ठरवलं तरच ही प्रथा बंद होऊ शकते. बालविवाहाचा शिकार झालेली आईच आपल्या मुलीला या प्रथेपासून वाचवू शकते.

भारताच्या प्रत्येक राज्यात पडदा पद्धत दिसून येते. इस्लाम धर्माच्या परिणामामुळे भारतात ही प्रथा उदयास आली. गांधीजींच्या मते ही प्रथा पाळणे म्हणजे स्त्रीचे स्वातंत्र्य काढून घेणे होय. गांधीजी म्हणतात,'पवित्रता मनात असावी लागते.' स्त्री–पुरुषाच्या विश्वासातून पवित्रता निर्माण होते. पडदा पद्धतीने स्त्रियांच्या शिक्षण व विकास प्रक्रियेत बाधा आणली आहे.

महात्मा गांधीजींचे स्त्री विषयक विचार हे तत्कालीन समाजव्यवस्थेवर आधारित आहेत. हे विचार त्यांनी ज्या वेळी मांडले त्या वेळी भारतात ब्रिटीश सत्तेचे शासन होते. त्या काळाची स्त्रियांची स्थिती ही दयनीय होती. गांधीजींचे स्त्रियांविषयीचा विचार हे त्याकाळातील पारंपारिक समाजव्यवस्थेला हादरा देणारा होता. स्त्री–पुरुष मुळातच सर्व बाबतीत समान असल्याने सर्व संधीच्या संदर्भात समानतेचा पुरस्कार महात्मा गांधीजींनी केला. ते स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी प्रतीचे किंवा हीन मानण्याच्या पूर्ण विरोधात होते. महात्मा गांधीजीं हे भारतातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्या आंदोलनात मोठ्या प्रमाणात स्त्रियांनी सहभाग घेतला.

## संदर्भ सूची :

१) विजय चोरमारे, स्त्री सत्तेची पहाट
२) दीपक पवार, 'महिलांचे राजकीय सबलीकरण
३) यंग इंडिया, दिनांक २६.०८.१९२५
४) माझे सत्याचे प्रयोग, महात्मा गांधी
५) दी सेकंड सेक्स, सिमोन द बोव्हूआर
६) Gandhian thoughts bySwanandS. Pathak